ePaper

| वर्ष - 7 । अंक - 92 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । बुधवार, दिनांक 2 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शिवसेना-राष्ट्रवादीनंतर काँग्रेसही फुटणार? : मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव



### आतील पानांत


- इशान किशनने रचला इतिहास
- मी सिगारेट ओढते
- बिहारमध्ये जातीय जनगणना
- 70 हजार कोटींचा घोटाळा?


# राष्ट्रनिर्मितीत टिळकांचे योगदान!

## » पंतप्रधान नरेंद्र मोदी : लोकामान्य टिळक पुरस्काराने गौरव




। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**“पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेजची उभारणी ही टिळकांच्या दूरदृष्टीतून झाली आहे. या संस्थांमधून अनेक युवकांनी शिक्षण घेतलं. या युवकांनी टिळकांचं काम पुढे नेण्याचं काम केलं. आणि राष्ट्रनिर्मितीसाठी आपली भूमिका बजावली,” अशा भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुण्यात प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला राज्यपाल रमेश बैस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह टिळक परिवारातील सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते. यानंतर बोलताना पंतप्रधान मोदींनी लोकमान्य टिळक आणि वीर सावरकर यांचा एक किस्सा सांगितला आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, “लोकमान्य टिळक यांच्यात युवकांमधील क्षमत ओळखण्याची दूरदृष्टी होती. याचे एक उदाहरण वीर सावरकरांच्या संबंधित एका घटनेमुळे मिळते. वीर सावरकर युवा असताना टिळकांनी त्यांची क्षमता ओळखली होती. सावरकरांनी विदेशात जाऊन शिक्षण घ्यावे आणि परत आल्यावर स्वातंत्र्यासाठी काम करावे, असं टिळकांना वाटत होते.”

“ब्रिटनमध्ये श्यामजी कृष्ण वर्मा हे मुलासांठी छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या नावाने शैक्षणिक शिष्यवृत्ती देत असत. टिळकांनी वीर सावरकरांची शिफारस वर्मा यांच्याकडे केली होती. त्यामुळे वीर सावरकर यांनी लंडनमध्ये जाऊन शिक्षण घेतलं आणि बॅरिस्टर बनले. अशाच प्रकारे अनेक युवकांना टिळकांनी घडवलं,” असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

**टिळक आणि गुजरातचे नाते...**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, लोकमान्य टिळक हे संपूर्ण देशासाठी आदर्श आहेत. महाराष्ट्रातील लोकांचं त्यांच्यावर विशेष प्रेम आहे.

महाराष्ट्रातील लोकांप्रमाणेच गुजरातमधील लोकांचंही लोकमान्य टिळकांशी खास नातं आहे. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात लोकमान्य टिळक दीड महिने अहमदाबादच्या साबरमती तुरुंगात कैद होते. तसेच ते १९१६ मध्ये अहमदाबादला आले होते. तुम्हाला ऐकून आनंद होईल की, इंग्रजांच्या जुलमी राजवटीच्या काळातही लोकमान्य टिळकांच्या स्वागतासाठी त्या काळात ४० हजारांहून अधिक लोक जमले होते. त्यांचं भाषण ऐकायला तिथल्या प्रेक्षकांमध्ये सरदार वल्लभभाई पटेलही उपस्थित होते. पटेलांनी अहमदाबादेत टिळकांचा पुतळा बसवण्याचा निर्णय घेतला.



> पुणे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती आणि तरुणांचं स्वप्न पूर्ण करणारे शहर आहे. पुण्यातील १५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आलं. हजारो कुटुंबांना घरे मिळाली आहेत. यासाठी मी पुण्यातील नागरिकांचे अभिनंदन करतो.जेव्हा नागरिकांचे जीवनमान उंचावते तेव्हा शहराचा विकास आणखी गतीने होत असतो.
>
> **– नरेंद्र मोदी,** पंतप्रधान.



> अलिकडच्या काळात या देशातल्या जवानांना देशाचं रक्षण करण्यासाठी साठी सर्जिकल स्ट्राईक केला होता. त्याची चर्चा होते आहे. मात्र लाल महालात शाहिस्तेखान जेव्हा आला होता आणि तो तळ ठोकून बसला होता तेव्हा या देशातला पहिला सर्जिकल स्ट्राईक छत्रपती शिवरायांनी केला. आपल्याला ही गोष्ट कधीच विसरता येणार नाही.
>
> **– शरद पवार,** अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

# लोकनेते लक्ष्मण जगताप यांची ‘स्वप्नपूर्ती’!

## » मेट्रो प्रत्यक्षात, पुणे ते पिंपरी प्रवास अवघ्या 22 मिनिटांत

### » दोन मार्गांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो सुरु व्हावी. नागरिक सार्वजनिक वाहतुकीकडे वळावेत. सुलभ आणि सार्वजनिक जलद वाहतुकीतून या शहराचा विकास व्हावा असे स्वप्न लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी पाहिले. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण मंगळवारी (दि. 1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आणि लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी पाहिलेल्या मेट्रोचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले अशा भावना शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी मंगळवारी व्यक्त केल्या.**

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण मंगळवारी (दि. 1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. जगताप म्हणाले, उद्घाटन झाल्यानंतर दुपारपासूनच पिंपरी-चिंचवड ते सिव्हील कोर्ट आणि डेक्कन जिमखाना ते रुबी हॉल या दुसऱ्या टप्प्यातील मार्गावर मेट्रो सेवा सुरु झाली.

आता मेट्रोमुळे पुणे रेल्वे स्थानक येथून पिंपरी येथे येण्यासाठी अवघे 22 मिनिट लागणार आहे. सध्या पिंपरी-चिंचवड महापालिका ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी आणि पहिल्या मार्गातील पिंपरी-चिंचवड महापालिका ते फुगेवाडी आणि दुसऱ्या मार्गातील वनाज ते गरवारे कॉलेज या 12.2 किलोमीटर दरम्यान मेट्रो सेवा सुरु आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 ऑगस्ट रोजी दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण केले. लोकार्पण झाल्यानंतर सकाळी सात ते रात्री दहा या कालावधीत दर दहा मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. त्यामुळे पुणे ते पिंपरी हे अंतर अवघ्या 22 मिनिटांमध्ये पार करता येणार आहे. सध्या पुणे मेट्रोच्या सेवेत 18 मेट्रो रेल्वे दाखल झाल्या आहेत.

पिंपरी चिंचवड शहर मेट्रो सिटी व्हावे असे स्वप्न लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी दशकापुर्वीच पहिले होते. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला देशाने स्वीकारले. त्यानंतर पिंपरी चिंचवड शहरानेही भाजपला कौल दिला. याचवेळी लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी चिंचवड शहर अधिक वेगवान व्हावे यासाठी मेट्रोची संकल्पना मांडली होती.

आज लोकनेते लक्ष्मण जगताप यांची संकल्पना प्रत्यक्षात उतरली. याचा शहरातील प्रत्येक नागरिकाला मनस्वी आनंद वाटत असल्याचे शंकर जगताप यांनी सांगितले.



### विद्यार्थ्यांना विशेष सवलत....

» पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मेट्रो प्रवासात तिकिटांसाठी 30 टक्के सवलत मिळेल. सर्वसामान्य प्रवाशांना शनिवार आणि रविवार या दोन दिवसात तिकिटावर 30 टक्के सवलत मिळेल. तसेच पुढील काही दिवसांत मेट्रो कार्ड कार्यान्वित केले जाणार असून त्यावर 10 टक्के सवलत मिळणार आहे.सर्वसामान्य नागरिकांना सवलत देण्यात येणार आहे. ही सवलत शनिवारी आणि रविवारी मिळणार आहे. मेट्रोचे भाडे १० ते ३५ रुपयांपर्यंत ठेवण्यात आले आहे. दर दहा मिनिटांना मेट्रोची सेवा असणार आहे.

> “ पिंपरी चिंचवड शहरातून मेट्रो धावावी असे स्वप्न लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्यासह येथील प्रत्येक नागरिकाने पहिले आहे. आज हे स्वप्न साकारले. यातून आपले शहर नक्कीच विकासाच्या नव्या अध्यायाला आरंभ करणार आहे. पुणे मेट्रोने प्रवासासाठी सवलत योजनाही आणली आहे. विद्यार्थ्यांना ३० टक्के सवलत तिकिट दरात देण्यात येणार आहे. पदवीपर्यंतच्या कोणत्याही विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केल्यानंतर दुपारी ३ वाजेपासून सर्वसामान्य प्रवाशांसाठी मेट्रो खुली झाली आहे.
>
> **- शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# संभाजी भिडे यांना तात्काळ अटक करा!

## » राष्ट्रवादी आक्रमक; आंबेडकर पुतळ्यासमोर आंदोलन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रगत आणि पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात संभाजी भिडेसारखे लोक थोर महात्म्यांबद्दल अवमानकारक टिप्पनी करून समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. एकाच आठवड्यात महात्मा गांधी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंचा अवमान करणाऱ्या संभाजी भिडेचा बोलाविता धनी कोण आहे ते शोधून काढून संभाजी भिडे याला तात्काळ अटक करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली आहे.**

शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजी भिडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासह अनेक समाजसुधारकांच्या बाबतीत केलेल्या अवमानकारक वक्तव्यांचा पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आंदोलन करून संभाजी भिडे यांचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी थोर पुरुषांचा अवमान करणाऱ्या भिडेला अटक करुन कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा कविता आल्हाट यांनी देखील आपले मत व्यक्त केले.

यावेळी, माजी नगरसेवक राहुल भोसले, शाम लांडे, विक्रांत लांडे, पंकज भालेकर, सतीश दरेकर, संगीताताई ताम्हणे, कार्याध्यक्ष फजल शेख, युवतीच्या अध्यक्षा वर्षा जगताप यांच्यासह कविता खराडे, विजय लोखंडे, गोरक्ष लोखंडे, संजय औसरमल, विशाल काळभोर, अकबर मुल्ला, सचिन औटे, गंगा धेंडे, पुष्पा शेळके,मनीषा गटकळ, ज्योती गोफणे, युवराज पवार, किरण देशमुख, बाळासाहेब पिल्लेवार, प्रसाद कोलते, संतोष निसर्गंध, अक्षय माछरे, संगीता कोकणे, मीरा कदम, विजय दळवी, सुनिता अडसुळे, अरुणा कुंभार, सविता धुमाळ, ज्योती तापकीर, उज्वला ढोरे, आशा शिंदे, नीलम कदम, दिपाली देशमुख, इमरान शेख, रवींद्र सोनवणे, राजू चांदणे, अश्विनी जाधव, महेश माने, प्रवीण पिंजन, जया गवळी यांच्यासह पक्षाचे आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### अवमानकारक वक्तव्ये करण्याची भिडेंची खोड

» पुढे बोलताना अजित गव्हाणे म्हणाले, संभाजी भिडे याला राष्ट्रपुरुषांच्या बाबतीत अवमानकारक वक्तव्ये करण्याची खोड आहे. ही वक्तव्ये जाणिवपूर्वक केली जात असून या माध्यमातून दोन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा आहे. या राज्यात संभाजी भिडेसारख्या अपप्रवृत्तींना थारा देता कामा नये. संभाजी भिडेसारख्या प्रवृत्ती या समाज भरकटविण्याचा प्रयत्न करत आहेत. संभाजी भिडेवर कारवाई करण्यास विलंब होत असून भिडेचा बोलविता धनी कोण आहे? ते देखील शोधून काढले पाहिजे. सातत्याने समाजसुधारकांचा अवमान करणाऱ्या भिडेला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही गव्हाणे यांनी यावेळी केली. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संभाजी भिडे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



# भोसरीत स्वप्नपूर्तीचा आनंदोत्सव!

## » पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण अन् भूमिपूजन

## » भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या प्रदीर्घ प्रयत्नांना यश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यावर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सुमारे १ हजार ९७० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी मोशीतील ‘ वेस्ट टू एनर्जी’ आणि प्रधान मंत्री आवास योजना बोऱ्हाडेवाडी प्रकल्पावर प्रत्यक्ष आनंदोत्सव साजरा करण्यात आला.**



पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्यामार्फत पंतप्रधान आवास योजना, वेस्ट टू एनर्जी अशा विविध प्रकल्पांचे लोकार्पण व भूमिपूजन शिवाजीनगर येथील पोलीस परेड ग्राउंडवर झालेल्या शानदार कार्यक्रमात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सुमारे १ हजार ९७० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन झाले. यापैकी सुमारे १ हजार ७२० कोटी रुपयांचे प्रकल्प पिंपरी-चिंचवड शहरातील आहेत. त्यामुळे मोदींच्या दौऱ्यात भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रकल्पांचा बोलबाला दिसला. ‘व्हीजन- २०२०’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील कचऱ्यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी ‘वेस्ट टू एनर्जी’ अर्थात कचऱ्यापासून वीजनिर्मिती हा प्रकल्प हाती घेतला होता.

२०१८ मध्ये प्रकल्पाचे काम सुरू झाले. हा प्रकल्प आता कार्यान्वयीत झाला असून, त्याद्वारे प्रतिदिन १ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया आणि १४ मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे समाविष्ट गाव मोशी आणि कचरा डेपो परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे ‘व्हीजन-२०२०’ मधील आश्वासनाची स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद स्थानिक नागरिकांनी प्रकल्पाच्या ठिकाणी केला. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन बटन दाबून प्रकल्पाचे उद्घाटन केले. तर त्याचवेळी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी आनंद साजरा करण्यात आला. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, माजी नगरसेवक सागर गवळी, कुंदन गायकवाड, विकास डोळस, लक्ष्मण सस्ते, दिनेश यादव, संतोष मोरे, दत्ता गव्हाणे, विनायक मोरे, सागर हिंगणे यांच्यासह मोशी आणि पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. तसेच, बोऱ्हाडेवाडी येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पाअंतर्गत १२८८ घरांचा चावीवाटप कार्यक्रम झाला. यावेळी माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे, मंगेश हिंगणे यांच्यासह स्थानिक नागरिक आणि लाभार्थी उपस्थित होते.



**“ ‘व्हीजन-२०२०’ अंतर्गत हाती घेतलेला ‘वेस्ट टू एनर्जी’ आणि प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्प पूर्ण झाला. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लाभार्थींना चावी वाटप झाले. तसेच, पिंपरी-चिंचवडचा कचरा प्रश्न सोडवण्यासाठी कचऱ्यापासून वीज निर्मिती करणारा प्रकल्प हा सर्वोत्तम आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी कौतूक केले. ही निश्चितच पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. या कार्यक्रमाला स्वत: उपस्थित राहता आले, त्याचा अभिमान वाटतो. या पुढील काळात प्रस्तावित प्रकल्प पूर्णत्वास नेऊन शहराला नव्या उंचीवर नेण्यासाठी प्रामाणिक काम करीत राहणार आहे.**

**- महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.




# सह्याद्रीच्या कड्याची ढाल ढासळू नये..

**संभाव्य दुष्परिणामांचा शास्त्रीय अभ्यास न करता सुरू असलेल्या तथाकथित विकासामुळे सह्याद्री पोखरला जात आहे. इरशाळवाडी दुर्घटना हा या विकासाचा भीषण चेहरा. गोवा, कर्नाटकात, केरळ, तमिळनाडूमध्येही अशाच संकटांना आमंत्रण दिले जात आहे.**

विंदा करंदीकर म्हणतात “देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे.. हिरव्या पिवळ्या माळाकडून हिरवी पिवळी शाल घ्यावी, सह्यद्रीच्या कड्याकडून छातीसाठी ढाल घ्यावी.’’ मी जन्मभर सह्याद्रीच्या उत्तर टोकापासून दक्षिण टोकापर्यंत अशी ढाल सरसावून छातीठोकपणे भटकंती करत राहिलो आहे. सुरुवातीला ढाल अगदी भरभक्कम होती पण अलीकडे ती चिराळते आहे. पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटातर्फे पवनचक्क्यांचा अभ्यास करताना मला याचा दारुण अनुभव आला. माळीण, तळीये आणि आता इरशाळवाडी ही अशाच काही खोल चिरांची परिणती आहे. महाराष्ट्राने गोदा, भीमा, कृष्णा नद्यांच्या उगमस्थानांपाशी त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर आणि महाबळेश्वराचे अधिष्ठान मांडून, तिथे देवराया राखून जपले आहे. नव्या जमान्यात गुप्तभीमेच्या देवराईच्या आसमंतात भीमाशंकर अभयारण्य घोषित केले आहे,



यातील भीमाशंकर अभयारण्याच्या दक्षिणेचा पट्टा एनकॉन कंपनीच्या पवनचक्क्यांना देण्यात आला आहे. याबाबत तिथल्या फॉरेस्ट रेंजरने प्रामाणिकपणे म्हटले, की या सदाहरित वनाच्छादित टापूत दुर्मीळ शेकरू खार, लांडगा, कोल्हा, तरस, मोर, बिबट्या आढळतात, इथे पवनचक्क्यांना परवानगी नाकारावी. हा अहवाल दडपून वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इथे सदाहरित वन नाही, महत्त्वाचे वन्य जीव नाहीत, असे धादांत खोटे-नाटे निवेदन करत पवनचक्क्यांना परवानगी दिली. मग मी तिथल्या महादेव कोळ्यांच्या खरपूड गावातील प्राथमिक शाळेत चार दिवस राहून पाहाणी केली, तेव्हा रेंजरचे निवेदन अगदी उचित होते, हे स्पष्ट झाले. पवनचक्क्या बसवण्यासाठी डोंगराच्या उभ्या चढावर अतिशय निष्काळजीपणे रस्ते बांधले होते. रस्त्यावर जागोजागी भूस्खलन झाले होते. तो राडारोडा पसरून डोंगराच्या पायथ्याच्या शेतीची, तिथल्या जलस्रोतांची नासाडी झाली होती आणि तो गाळ पुढे वाहत जाऊन आरळा नदीवरच्या कळमोडी धरणात, भामा नदीवरच्या भामा आसखेड धरणात भराभर साचत होता.

भारतभरातील धरणांत अपेक्षेपेक्षा चार ते सोळापट वेगाने गाळ साठत आहे आणि त्यामुळे एकूण देशाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. शिवाय एनकॉनने बळकावलेल्या डोंगरावर धनगरांची, कोळ्यांची वस्ती होती. त्यांना जबरदस्तीने हाकलून दिले होते. येथील अनेक ग्रामसभांनी आम्हाला हा प्रकल्प नको असे ठराव केले होते. त्यांना केराची टोपली दाखवून लोकशाहीची विटंबना सुरू होती. या सगळ्यात वन विभागाची स्पष्ट हातमिळवणी होती. आमच्या अहवालात आम्ही हा सर्व तपशील मांडला, त्यावर पुण्यात महापौरांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली. तिथे वन विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी काहीही समर्थन दिले नाही, फक्त हसत राहिले. ते जाणून होते की शहरी पर्यावरणवादी त्यांना पाठिंबा देत स्थानिक ग्रामस्थांनाच निसर्गाची नासाडी करतात म्हणून दोषी धरणार होते. अशा बेदरकारपणे केलेल्या नानाविध हस्तक्षेपांतून गेल्या दशकात सह्यद्रीच्या मुलखात छोट्या-मोठ्या भूस्खलनांच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत आहे. एका अंदाजाप्रमाणे १० वर्षांत ते १०० पट वाढले आहे. असे हाहाकार महाराष्ट्रात, गोव्यात, कर्नाटकात, केरळात, तमिळनाडूत सर्वदूर सुरू आहेत. या मालिकेतीलच एका फटक्यातून १६ ऑक्टोबर २०२१ रोजी केरळातील कोट्टायम जिल्ह्यतील कुट्टीक्कलमध्ये महाभयंकर हानी झाली. १४ जण मृत्युमुखी पडले. तेथील रहिवासी दशकाहून जास्त काळ दगडखाणींमुळे त्रस्त आहेत; त्या बंद कराव्यात म्हणून आक्रोश करत आहेत. कुट्टीक्कलपासून २५ किलोमीटर अंतरावरील काडनाडमध्ये व्यवस्थित माहिती संकलित करून तिच्या आधारावर या संकटाला तोंड देण्याचा प्रयत्न केला गेला होता. काडनाड ग्रामपंचायतीने १० मे २०११ रोजी कोणतेही मोठे बांधकाम पंचायतीच्या आणि स्थानिक जैवविविधता व्यवस्थापन समितीच्या संमतीशिवाय करता येणार नाही, असा निर्णय घेतला.

## संपादकीय »

### रेल्वेतले रस्त्यावर?

***धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब असल्याने कोणत्या धर्माविषयी ममत्व बाळगावे वा नाही, हा प्रश्नही वैयक्तिक...***

धर्म, जात, वर्ण अशा मुद्द्यांवर सत्ताधीशांनी किती हवा तापवावी याचे भान असणे सामाजिक सौहार्दासाठी आवश्यक असते. हे सर्व घटक एका अर्थी नैसर्गिक. म्हणजे ते निवडण्याचा अधिकार व्यक्तीस नसतो. जन्माला येतानाच प्रत्येक व्यक्ती धर्म, जात आणि वर्ण घेऊन जन्माला येत असते. म्हणून जी गोष्ट निवडण्याचा अधिकार व्यक्तीस नाही तीबाबत ‘गर्व से’ म्हणण्यासारखे काय? पण तरीही या मुद्द्यावर डोकी भडकावण्याचे उद्योग वर्षांनुवर्षे सुरू आहेत आणि भरल्या डोक्यांनी-भरल्या पोटांनी तो करणारे; दोन्हींची वानवा असणाऱ्यांची डोकी फुटणे थांबावे यासाठी निष्क्रिय आहेत. ही निष्क्रियता नव्याने जाणवण्याचे कारण म्हणजे सोमवारी जयपूर-मुंबई रेल्वेतील हत्याकांड. यात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानाने चार जणांचे हकनाक प्राण घेतले. त्यात एक त्याचा वरिष्ठदेखील आहे. या चौघांचे प्राण या जवानाने घ्यावेत असे काही घडले होते असे नाही.

**‘शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी संघटनेच्या सामर्थ्यांचा अभिमान बाळगताना संघटनेच्या बळाला असलेल्या मर्यादांचे नेहमीच भान ठेवले. १९८९ ते २०१३ या काळात भाजपशी अनेकदा मतभेद होऊनही, युती तुटू नये याची खबरदारीही बाळासाहेबांनी नेहमीच घेतली. . याउलट उद्धव ठाकरे हे भाजप श्रेष्ठींनी न दिलेल्या शब्दाचे असत्य कथन करत आहेत’ अशी मते अलीकडील मुलाखत संपूर्ण पाहून व्यक्त करणारे टिपण...**

# घरगुती मुलाखतीतील रडगाणे

माजी मुख्यमंत्री उद्धवराव ठाकरे यांची त्यांच्याच पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी घेतलेली ‘घरगुती आणि दीर्घ मुलाखत’ नेहमीप्रमाणे रडगाणे स्वरूपाचीच होती. वर्षांनुवर्षे त्याच त्या भाषेचे दळण दळणाऱ्या उद्धवरावांची ही मुलाखत त्यांच्या हताश आणि वैफल्यग्रस्त मनोवृत्तीची साक्ष देणारी होती. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर भारतीय जनता पार्टीशी केलेल्या दगाबाजीचे समर्थन करता येत नसल्याने आणि काँग्रेस- शरद पवारांच्या संगतीला जाऊन बसावे लागल्याने आपले डावपेच चुकल्याची अप्रत्यक्ष कबुलीच त्यांना अशा मुलाखतीद्वारे द्यावी लागत आहे. राजकारणाच्या पटावरच्या सोंगट्या मनाविरुद्ध पडल्यानंतर त्याही परिस्थितीत लढण्याचे धैर्य आणि चातुर्य दाखवणारा राजकारणीच या खेळात पाय रोवून उभा राहतो, याचे आकलन करण्याची क्षमता नसल्याने आपला असहायपणा शब्दांचे बुडबुडे



उडवून झाकणाऱ्या उद्धवरावांकडे पाहून महाभारतातली दुर्योधन, दु:शासन, धृतराष्ट्र, शकुनीमामा अशी अनेक पात्रे डोळ्यापुढे उभी राहतात. या समस्त पात्रांच्या गुणवैशिष्ट्यांचा समुच्चय असलेल्या उद्धवरावांना नियतीने केलेल्या परतफेडीचा घाव सहन करता आलेला नाही, हे मुलाखत पाहताना वारंवार जाणवत होते.

पांडवांना हक्काने मिळणारे राज्य कपटाने हिसकावून घेणारे कौरव आपल्या सत्तेच्या हव्यासाचे जाहीरपणे निर्लज्ज समर्थन करत होते. सुईच्या टोकावर मावेल एवढी जमीनही पांडवांना देणार नाही, असे सांगण्याचा उद्दामपणा दुर्योधनाने राजसभेत दाखवला होता. भारतीय जनता पार्टीशी मुख्यमंत्रीपदाच्या लालसेने आपण दगाबाजी केली. हे कबूल करण्याएवढे धैर्य उद्धवरावांकडे नसल्याने भाजप श्रेष्ठींनी न दिलेल्या शब्दाचे असत्य कथन करत आपल्या दगाबाजीच्या मुखवट्याला नैतिकतेचा लेप चढवण्याचा प्रयत्न उद्धवरावांकडून गेल्या साडेतीन वर्षांत वारंवार होतो आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनाप्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रखर राष्ट्रवादाचे वारंवार स्मरण होणे साहजिकच आहे. श्रीमती सोनिया गांधी यांच्या विदेशी नागरिकत्वाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या राजकारण प्रवेशाला विरोध झाला होता. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी याच मुद्द्यावर सोनियाजींना विरोध केला होता. हयात असेपर्यंत आदरणीय बाळासाहेबांनी आपली सोनियाजींबद्दलची भूमिका तसूभरही बदलली नाही. शरद पवार यांनी त्यांच्या परंपरागत शैलीनुसार सोनियाजींबद्दलची आपली भूमिका बदलली.

## ।। अभंगवाणी ।।



हासों रुसों आतां वाढवूं आवडी ।
अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥

सेवासुखें करूं विनोदवचन ।
आम्ही नारायण एकाएकीं ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 70 हजार कोटींचा घोटाळा?

## » दूध का दूध अन् पाणी का पाणी होईल : अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आरोपांवर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेत्यांनी आपली भूमिका मांडली होती. परंतु, अजित पवारांनी यावर कधीच शब्द देखील काढला नाही. पहिल्यांदाच माध्यमांशी बोलत असताना अजित पवारांनी 70 हजार कोटी रुपयांच्या घोटाळा आरोपावर आपली भूमिका मांडली.**

नरेंद्र मोदींनी केलेल्या 70 हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार आरोपांवर अजित पवार म्हणाले, नेत्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे राजकीय आरोप होतात. एमएससी बँक (महाराष्ट्र राज्य सहकार बँक) घोटाळ्याच्या वेळी 25 हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप झाला होता. त्यानंतर 10 हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप झाला. त्यानंतर याप्रकरणी सीआयडीने चौकशी केली, डीओडब्ल्यू विभागाने चौकशी केली, एसीबीने चौकशी केली, सहकार विभागाने चौकशी केली. आज ती एमएससी बँक गेल्या दोन-तीन वर्षात लागोपाठ 600 ते 650 कोटी रुपयांच्या नफ्यात आहे. अजित पवार म्हणाले, मला बदनाम करण्यासाठी जाणीवपूर्वक



असे प्रयत्न झाले. तरी त्याच्या चौकशीतून काय निष्पन्न होणार आहे हे मला माहिती नसेल तर मी थांबणं गरजेचं आहे. म्हणून मी इतके दिवस थांबलो होतो. यावर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी अजित पवारांना विचारलं, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आरोप खोटा आहे का? त्यावर अजित पवार म्हणाले, पंतप्रधान किंवा वेगवगळ्या राज्याचे मुख्यमंत्री असतील, आपण त्यांचा आदर राखला पाहिजे.

त्यांना जी भूमिका योग्य वाटली ती त्यांनी मांडली. आज त्यांच्या हातात संपूर्ण देश आहे. आरोपांबद्दल चौकशा सुरू आहेत. चौकशीत सत्य बाहेर येईल. दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन महिन्यांपूर्वी भोपाळ येथे भाजपाच्या बुथ कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसवर गंभीर आरोप केले होते. पंतप्रधान मोदी म्हणाले होते, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर तब्बल 70 हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप आहे. असं एकही क्षेत्र नाही जिथे काँग्रेसने घोटाळा केला नसेल. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवरही घोटाळ्यांचे अनेक आरोप आहेत.

या आरोपांनंतर महिन्याभराने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी बंडखोरी करून महायुतीत प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांचा मोठा गट बरोबर घेत अजित पवार यांनी भाजपा-शिंदेसेनेशी हातमिळवणी केली आमि ते सत्तेत सहभागी झाले.

### राजकीय भूमीका वेगळी

» महाराष्ट्रातील राजकीय बदल होण्याआधी स्वतः पवार साहेबांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टिळक ट्रस्टच्या वतीने स्वतः आमंत्रित केले होते. त्यामुळे ते या कार्यक्रमासाठी एका व्यासपिठावर आले. त्यामुळे आमची राजकीय भूमीका वेगळी आणि कुटुंबातील संवाद वेगळा आहे. विनाकारण संभ्रम निर्माण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे विधान एनसीपीचे बंडखोर आमदार तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

# राज्यात पुढील 4-5 दिवसांत मुसळधार !

## » उद्या मुंबई, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात पुढील 4 ते 5 दिवसात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. बंगालच्या किनारपट्टीवर निर्माण झालेला तीव्र कमी दाबाचा पट्टा पुढे सरकत असून आज संध्याकाळी तो बांगलादेश किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून उसंत घेतलेल्या पाऊस पुन्हा एकदा मुसळधार कोसळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**



बांगलादेश किनाऱ्यावर बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. मंगळवारी संध्याकाळपर्यंत ते खेपुपाराच्या पूर्वेला बांगलादेश किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुढील 24 तासांत पश्चिम बंगालमधील गंगा नदीचे खोरे ओलांडण्याची शक्यता आहे. याचा परिणाम राज्यातील हवामानावर होणार असून पुढील अवघ्या चार ते पाच दिवसात राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आयएमडीने दिलेल्या इशाऱ्यानुसार, मंगळवारी रात्री सातारा आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर पुणे, रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी आणि मुंबईमध्ये तसेच विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या ठिकाणी यलो अलर्ट दिला आहे. बुधवारी अर्थात 2 ऑगस्ट रोजी मुंबई, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग आणि सातारा या पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला असून या ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तचे कोल्हापूर, रत्नागिरीसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

गुरूवारी 3 ऑगस्ट रोजी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग आणि सातारा जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर कोल्हापूर, रत्नागिरीसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवारी 4 ऑगस्ट रोजी मुंबई, पालघर, रायगड, पुणे, सिंधुदुर्ग आणि सातारा या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता

» राज्यात काही जिल्ह्यांचा अपवाद वगळला तर जुलै महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पाहायला मिळाला. पण ऑगस्ट महिना हा अधिकाधिक प्रमाणात कोरडा जाण्याचीच शक्यता आहे. भारतीय हवामान विभागानं पुढील दोन महिन्यांसाठी पावसाचा अंदाज जाहीर केला आहे. या दोन महिन्यांमध्ये देशात मान्सून सामान्य राहिल, असा अंदाज आहे. महाराष्ट्रातही ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांमध्ये पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### उद्या पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

» 2 ऑगस्ट रोजी मुंबई, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग आणि सातारा या पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला असून या ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तचे कोल्हापूर, रत्नागिरीसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. गुरूवारी 3 ऑगस्ट रोजी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग आणि सातारा जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर कोल्हापूर, रत्नागिरीसह उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला.

# दिल्ली अध्यादेश विधेयक लोकसभेत

## » विधेयक संविधानाचे उल्लंघन करत आहे : अधीर रंजन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना-बदलींवर नियंत्रण ठेवणारे विधेयक मंगळवारी (१ ऑगस्ट) लोकसभेत मांडण्यात आले. काँग्रेस नेते काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी म्हणाले - हे विधेयक संविधानाचे उल्लंघन असून हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बदलण्याचा प्रयत्न आहे. 25 जुलै रोजी या अध्यादेशाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. विधेयक मांडण्यापूर्वीच सभागृहाचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.**




आपचे राघव चड्ढा म्हणाले की, यामुळे दिल्लीतील लोकशाही 'बाबूशाही'मध्ये बदलेल. निवडून आलेल्या सरकारचे सर्व अधिकार काढून घेतले जातील आणि भाजपने नियुक्त केलेल्या एलजीला दिले जातील. केंद्राने 19 मे रोजी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा अध्यादेश जारी केला होता. अध्यादेशात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा ११ मेचा निर्णय रद्द केला, ज्यामध्ये दिल्ली सरकारला बदली-पोस्टिंगचा अधिकार मिळाला होता. केंद्र सरकारने एका अध्यादेशाद्वारे दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार लेफ्टनंट गव्हर्नरना दिले होते. याविरोधात दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी १७ जुलै रोजी सांगितले की, आम्ही हे प्रकरण पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे पाठवू इच्छितो. मग घटनापीठ ठरवेल की केंद्र अशा सुधारणा करू शकते की नाही? केंद्राने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून म्हटले होते की, संविधानाच्या कलम २४६(४) मुळे संसदेला भारताच्या कोणत्याही भागासाठी आणि राज्यामध्ये समाविष्ट नसलेल्या कोणत्याही बाबीबाबत कायदे करण्याचा अधिकार दिला जातो. केंद्राच्या अध्यादेशानुसार दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा अंतिम निर्णय लेफ्टनंट गव्हर्नर म्हणजेच एलजीचा असेल. यात मुख्यमंत्र्यांना कोणताही अधिकार राहणार नाही. केजरीवाल सरकारने ३० जून रोजी न्यायालयात याचिका दाखल करून केंद्राच्या अध्यादेशाला आव्हान दिले होते. या प्रकरणाची पहिली सुनावणी ४ जुलै रोजी झाली, जेव्हा न्यायालयाने केंद्र सरकार आणि नायब राज्यपालांना नोटीस बजावली.

### अध्यादेश म्हणजे काय?

» जेव्हा संसद किंवा विधानसभेचे अधिवेशन चालू नसते तेव्हा केंद्र आणि राज्य सरकारे तात्काळ गरजेनुसार राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या परवानगीने अध्यादेश जारी करतात. संसदेने/विधानसभेने संमत केलेल्या कायद्याप्रमाणेच त्याला अधिकार आहेत.

संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या पुढील अधिवेशनात सहा महिन्यांत अध्यादेश काढणे बंधनकारक आहे. जर सभागृहाने ते विधेयक मंजूर केले तर ते कायदा बनते. विहित वेळेत सभागृहात पास न केल्यास ते बंद होते. मात्र, सरकार तोच अध्यादेशही पुन्हा पुन्हा जारी करू शकते.

# बिहारमध्ये जातीय जनगणना

## » पाटणा हायकोर्टाचा सरकारला दिलासा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये जात प्रगणना पूर्ण होणार आहे. बिहार सरकारला पाटणा उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. उच्च न्यायालयाने बंदीच्या मागणीशी संबंधित याचिका फेटाळून लावल्या आहेत. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश के. विनोद चंद्रन यांनी हा निकाल दिला याचिकाकर्त्यांचे वकील दिनू कुमार म्हणाले की, उच्च न्यायालयाचा निर्णय एका ओळीत आला आहे. ज्यामध्ये रिट याचिका फेटाळत असल्याचे म्हटले होते.**



### याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद

याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले की, जात जनगणना करणे हे बिहार सरकारचे काम नाही. हे केंद्राचे काम आहे. घटनेतील कलमाचे उदाहरण देत याचिकाकर्त्यांच्या वतीने राज्य सरकार आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर काम करत असल्याचे याचिकाकर्त्यांच्या वतीने सांगण्यात आले. बिहार सरकारने यावर 500 कोटींची उधळपट्टी केली आहे.

म्हणजे जात प्रगणना करता येते. उच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधारे ही गणना केली जाईल. या निर्णयाविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव म्हणाले की, आर्थिक न्यायाच्या दिशेने जात गणना हे एक क्रांतिकारी पाऊल असेल. केंद्र सरकारने जात जनगणना करावी, अशी आमची मागणी आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे भाजपने स्वागत केले आहे. विजय सिन्हा म्हणाले की, आम्ही जात गणनेच्या बाजूने आहोत. जनगणनेचा उद्देश स्पष्ट करण्यात सरकार अपयशी ठरले. बिहार सरकारच्या हेतूत दोष आहे. 4 मे रोजी पाटणा उच्च न्यायालयाने जात गणनेला स्थगिती दिली होती आणि आतापर्यंत गोळा केलेला डेटा सुरक्षित ठेवण्याचे निर्देश सरकारला दिले होते. पुढील सुनावणीची तारीख 3 जुलै निश्चित करण्यात आली आहे. ज्यावर सलग 5 दिवस सुनावणी सुरू होती. पाटणा उच्च न्यायालयाने 7 जुलै रोजी या प्रकरणाची सुनावणी पूर्ण केली. मुख्य न्यायाधीश के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती पी सारथी यांच्या खंडपीठासमोर पहिले तीन दिवस याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला. त्यानंतर दोन दिवस बिहार सरकारचे महाधिवक्ता पी के शाही यांनी युक्तिवाद केला.

सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. अखिलेश सिंह यांच्यासह 10 ते 12 जण याचिकाकर्ते आहेत. यापूर्वीही जातप्रगणना थांबवण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेण्यास नकार देत उच्च न्यायालयात जाण्यास सांगितले होते. यानंतर पुन्हा सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. हे त्वरित थांबवले नाही तर जात जनगणना पूर्ण होईल, असा युक्तिवाद करण्यात आला. मग त्याला काही अर्थ उरणार नाही.

# राज्यात कायदा-सुव्यवस्था नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मणिपूरमध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढल्या प्रकरणी मंगळवारी म्हणजेच 1 ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने पोलिस तपास सुस्त असल्याचे सांगितले. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. लाइव्ह लॉनुसार, सुमारे 3 महिन्यांपासून राज्यातील जातीय हिंसाचारात एकही एफआयआर नोंदविला गेला नाही याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. नंतर, जेव्हा 6000 हून अधिक एफआयआर नोंदवले गेले, तेव्हा त्यात खूप कमी अटकेची कारवाई करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरच्या डीजीपींना न्यायालयात हजर राहून या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचे निर्देश दिले आहेत. एफआयआरच्या विलंबावर केंद्राने न्यायालयाला सांगितले की, मणिपूरमधील परिस्थिती अत्यंत वाईट आहे. मुख्य न्यायमूर्ती चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पारदीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. पीडित महिलांची ओळख याचिकेत उघड करण्यात आलेली नाही. त्यांना X आणि Y असे संबोधले जाते. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी 7 ऑगस्ट रोजी दुपारी 2 वाजता होणार आहे. कुकी महिला बलात्कार आणि हत्या प्रकरणात याचिकाकर्त्यांची बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ वकील वृंदा ग्रोव्हर यांनी सांगितले की, हा अहवाल कायद्याच्या विरोधात आहे. त्यात पीडितांची नावे आहेत. सुप्रीम कोर्टाने लगेचच केंद्र सरकारला हा अहवाल कोणाशीही शेअर करू नये असे निर्देश दिले. प्रसारमाध्यमांना देऊ नका. अन्यथा पीडितांची नावे बाहेर येतील. आम्ही आमच्या प्रतीमध्ये दुरुस्त्या करू, असे न्यायालयाने सांगितले. त्यावर केंद्राने सांगितले की, आम्ही ते कोणाशीही शेअर केलेले नाही. आमच्याकडे आमची प्रत आहे आणि एक प्रत खंडपीठासमोर ठेवली आहे.

# बाईपण भारी सिक्वेलची तयारी?



बाईपण भारी देवा सिनेमा सध्या सगळीकडे चांगलाच गाजतोय. बाईपण भारी देवा पाहायला अनेकांनी गर्दी केली. महाराष्ट्रात नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही सिनेमा पहायला प्रेक्षकांनी गर्दी केली. हैद्राबादमध्ये सुद्धा महिलांनी बाईपण भारी देवा पहायला थिएटर हाऊसफुल्ल केलं. बाईपण भारी देवा ला प्रेक्षकांनी डोक्यावर केलं. अशातच बाईपण भारी देवाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा सुरु झालीय. बाईपण भारी देवा सिनेमाचे दिग्दर्शक केदार शिंदे यांनी सोशल मिडीयावर एक फोटो पोस्ट केलाय. या फोटोमध्ये बाईपण भारी देवा ची कथाकार वैशाली नाईक बाईपण.. साठी काम केलेला लेखक, दिग्दर्शक, पटकथाकार ओंकार दत्त पहायला मिळत आहेत. "एक कहानी खतम तो दुजी शुरु हो गयी मामू.. बाईपण भारी देवा नंतर.. काहीतरी भारी.." असं कॅप्शन दिलंय. या फोटोला चाहत्यांनी पसंती दिलीय. बाईपण भारी देवा सिनेमाच्या या टीमला पाहून अनेकांना सिनेमाच्या सिक्वेलची तयारी सुरु झालीय, अशा चर्चा सुरु झाल्यात. बाईपण भारी देवा लेटेस्ट बॉक्स ऑफीस रिपोर्ट समोर आलाय. यावरुन दिसतं की... ३० दिवसात बाईपण भारी देवा सिनेमाने ७० कोटीहून जास्त कमाई केलीय.हॉलीवूड - बॉलीवूडच्या गर्दीतला मऱ्हाठमोळा आकडा, असं कॅप्शन देत ही आनंदाची बातमी बाईपण भारी देवा सिनेमाच्या टीमने शेअर केलीय. केदार शिंदे बाईपण भारी देवाच्या रेकॉर्डब्रेक कामगिरी बद्दल म्हणतात.. "आपण न मागता परमेश्वर भरभरून देतो.. तो नेमका कोणत्या रूपात प्रकट होतो? ते कधीच कळत नाही. यावेळी मात्र त्याचं रूप पाहिलं.. रसिक प्रेक्षकांच्या रूपातच परमेश्वर प्रत्येक चित्रपट गृहात अवतरला.

## परतणार दिशा वकानी

'तारक मेहता का उल्टा चष्मा' या टीव्ही शोमधील लोकप्रिय पात्र दयाबेन गेल्या सहा वर्षांपासून गायब आहे. या शोमध्ये दयाबेनची भूमिका करणारी दिशा वकानी 2017 मध्ये प्रसूती रजेवर गेली होती. तेव्हापासून आजतागायत ती शोमध्ये परतली नाही. मात्र, दिशा दयाबेनच्या भूमिकेत शोमध्ये परतणार असल्याचे आता निश्चित झाले आहे. अलीकडेच या शोला १५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने निर्माते असित मोदी यांनी एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, ते लवकरच दिशाला शोमध्ये परत आणणार आहे. असित म्हणाले, 'या 15 वर्षांच्या प्रवासासाठी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. आपल्यातील एका कलाकाराला आपण विसरू शकत नाही. ती कलाकार म्हणजे दयाबेन उर्फ दिशा वकानी. गेली अनेक वर्षे त्याने आम्हा सर्वांना हसवले आहे. चाहते तिच्या घरी परतण्याची वाट पाहत आहेत आणि आज मी वचन देतो की मी लवकरच दिशाला शोमध्ये परत आणेन.



## मी सिगारेट ओढते

टीव्ही मनोरंजन विश्वामध्ये सध्या बिग बॉस ओटीटीची मोठ्या प्रमाणात चर्चा आहे.गेल्या काही दिवसांपासून या रियॅलिटी शो मधील वेगवेगळे स्पर्धक लाईमलाईटमध्ये आले आहेत. एल्विश हा त्यापैकी एक. सोशल मीडियावर देखील चाहत्यांनी आपआपल्या सेलिब्रेटींविषयी पोस्ट करण्यास सुरुवात केली आहे. अशातच अभिनेत्री, सेलिब्रेटी आशिका भाटिया ही चर्चेत आली आहे. त्याचे कारण तिनं केलेलं एक वादग्रस्त विधान. यापूर्वी देखील आशिकानं वेगवेगळी विधानं करुन नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला होता. आता तर तिनं भलतेच काही बोलून वाद ओढावून घेतला आहे. आपण सिगारेट ओढतो हे आईला माहिती आहे. तेव्हा बाकीच्यांनी त्यात उगाचच नाक खूपसु नये. कोण काय करते यापेक्षा आपण काय करतो हे तिनं सांगितले आहे. आशिका ही आता बिग बॉस ओटीटी मधून बाहेर पडणारी शेवटची स्पर्धक होती. असे सांगितले जात आहे. तिच्यात आणि मनिषा रानी यांच्यात तीव्र स्पर्धा होती. पहिल्यापासून ती आणि मनिषा यांच्यातील स्पर्धा वाढत होती. नेटकऱ्यांची पसंती देखील आशिका नसून मनिषाला असल्याचे दिसून आले. याला कारणीभूत आशिका स्वताच असल्याचे तिच्या चाहत्यांचे म्हणणे आहे. आशिकाचे बोलणे, वागणे आणि आक्रमक स्वभाव याचा फटका तिला बसल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. यावेळी इंडिया टूडेनं जेव्हा आशिकाची मुलाखत घेतली तेव्हा तिनं तिच्या बिग बॉसमधील प्रवासाविषयी सांगितले. त्यावेळी तिनं आपल्या सिगारेट ओढण्याची सवय होती. आणि त्याबाबत आईला माहिती होते. असे सांगितले. पण आता मला कुणाचेच काही वाटत नाही. अशा शब्दांत आशिकानं प्रतिक्रिया दिली होती. आईला माहिती आहे मी काय आहे आणि काय करते तेव्हा मला बिग बॉसच्या घरात कुणालाही काय फरक पडतो याविषयी मला देणे घेणे नाही. असेही आशिकानं म्हटले आहे. सध्या आशिकाची ती प्रतिक्रिया सोशल मीडियावर चर्चेचा विषय आहे. मला हेही माहिती आहे बिग बॉसच्या घरातील सदस्यांनी वेगवेगळ्या प्रकारची चर्चा केली आहे. पण त्याचा मी माझ्यावर काही एक परिणाम होऊ देणार नाही.

## शमिता शेट्टीचा एक्स बॉयफ्रेंड रुग्णालयात

राकेश बापटची धक्कादायक बातमी समोर आली आहे. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राकेशनं सोशल मीडियावर पोस्ट करुन याविषयीची अधिक माहिती दिली आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी राकेश आणि शमिता शेट्टी यांच्यातील डेटिंगची चर्चा चांगलीच रंगली होती. राकेशनं त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवरुन एक व्हिडिओ शेयर केला आहे. त्यात तो रुग्णालयात उपचार घेताना दिसतो आहे. त्या फोटोमध्ये भलेही त्याचा चेहरा दिसत नसला तरी त्यानं थर्मामीटरचा इमोजी शेयर करुन चाहत्यांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. राकेश हा नेमक्या कोणत्या कारणामुळे रुग्णालयात दाखल झाला हे समजू शकलेले नाही. त्यामुळे चाहते काळजीत आहेत. राकेश हा शमितासोबत २०२१ मध्ये बिग बॉस ओटीटीच्या पहिल्या सीझनमध्ये दिसला होता. त्यात तो मोठ्या प्रमाणात लोकप्रियही झाला होता. त्याचवेळी त्याची शोमधील स्पर्धक शमिता शेट्टी सोबत ओळख झाली. त्यांच्यात मैत्री वाढली आणि नंतर ते एकमेकांच्या प्रेमातही पडले. शोच्या दरम्यान कपल्स म्हणून त्याची जोरदार चर्चाही झाली. बिग बॉस संपल्यानंतर ते एकमेकांना डेटही करत होते.



## 'मेड इन हेवन 2' चा ट्रेलर

प्राइम व्हिडियो या भारतातील सर्वात लोकप्रिय एंटरटेनमेंट डेस्टिनेशनतर्फे आज 'मेड इन हेवन' या ॲमेझॉन ओरिजिनल सीरीजच्या दुसऱ्या सीझनचा ट्रेलर रिलीज करण्यात आला.इंटरनॅशनल एमी पुरस्कारांमध्ये नामांकन मिळालेल्या या शोमध्ये भारतीय लग्नसमारंभांमधील परंपरा,आधुनिक महत्त्वाकांक्षा आणि सामाजिक रुढी यांच्यातील विरोधाभास दाखविण्यात आला आहे. सीझन 1 च्या शेवटी, या सीरीजमधील प्रमुख पात्रे एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचलेली होती. तिथूनच 'मेड इन हेवन'चा दुसरा सीझन सुरू होतो. नवीन वधु आणि नव्या आव्हानांसह आपले आवडते वेडिंग प्लॅनर्स त्यांच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यातील चढउतारांना सामे जातात.'मेड इन हेवन'चा दुसरा सीझनही अधिक भव्य, रोमान्स, नाट्य, लग्नसमारंभांनी भरलेला असणार आहे. यात काही ओळखीचे आणि काही नवीन चेहरे आणि खिळवून ठेवणारे कथानक आहे. इंटरनॅशनल एमी पुरस्कारांमध्ये नामांकन मिळालेल्या शोच्या या नव्या सीझनमध्ये यातील व्यक्तिरेखांच्या आयुष्यात अधिक खोल जाण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लग्नसमारंभ आयोजित करण्याच्या आणि साजरे करण्याच्या किचकट प्रक्रियेतून या व्यक्तिरेखा जात असतात तर दुसरीकडे त्यांच्या आयुष्यात अनपेक्षित घटना घडत असतात. मेड इन हेवन 2 मध्ये शोभिता धुलिपाला, अर्जुन माथुर, जिम सर्भ, कल्की कोचलिन, शशांक अरोरा, शिवानी रघुवंशी आणि विजय राज या कलाकारांसोबतच मोना सिंग, इश्वाक सिंग आणि त्रिनेत्रा हलदर हे नवे चेहरेही पाहायला मिळणार आहेत. या सीरीजचे दिग्दर्शन अलंकृता श्रीवास्तव, नीरज घेवान, नित्या मेहरा, रीमा कागटी आणि झोया अख्तर यांनी केले आहे तर रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांची एक्सेल मीडिया अँड एंटरटेनमेंट आणि झोया अख्तर व रीमा कागटी यांची टायगर बेबी यांनी या सीरिजची निर्मिती केली आहे. पहिल्या सीझनच्या यशस्वी कामगिरी नंतर मेड इन हेवन 2 आता रिलीज होतोय.

मेड इन हेवनच्या पहिल्या सीझनला प्रेक्षकांची चांगली पसंती मिळाली. आता मेड इन हेवन 2 अमेझॉन प्राईम वर रिलीज होतोय. १० ऑगस्ट पासुन मेड इन हेवन 2 सिरीज अमेझॉन प्राईम रिलीज होणार आहे.

# इशान किशनने रचला इतिहास

## » सलग तिसरे अर्धशतक: धोनीच्या विक्रमाशी बरोबरी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आज त्रिनिदादच्या ब्रायन लारा स्टेडियमवर खेळवला जात आहे. या निर्णायक सामन्यात नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना इशान किशन आणि शुभमन गिल या जोडीने शतकी भागीदारी करत शानदार सुरुवात केली. या काळात दोन्ही फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. या दरम्यान इशान किशन मालिकेत सलग तिसरे शतक झळकावत एक विक्रम केला आहे**



इशान किशनचे हे वेस्ट इंडिज दौऱ्यावरील सलग चौथे अर्धशतक आणि तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील सलग तिसरे अर्धशतक आहे. इशानने या मालिकेतील सलग तिसरे अर्धशतक ४३ चेंडूत पूर्ण केले. त्याने दुसऱ्या आणि पहिल्या एकदिवसीय सामन्यात आणि त्याआधी दुसऱ्या कसोटीतही अर्धशतकी खेळी केली होती. त्यानंतर इशान किशन ६४ चेंडूत ८ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची खेळी केली. त्याचबरोबर त्याने एमएस धोनीच्या एका विक्रमाची बरोबर केली. वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत सलग तिसरे अर्धशतक झळकावल्यानंतर इशानने एमएम धोनीच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. इशान आता वेस्ट इंडिजमध्ये यष्टिरक्षक म्हणून सर्वाधिक ५० पेक्षा जास्त धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने तिसऱ्यांदा वेस्ट इंडिजमध्ये यष्टिरक्षक म्हणून सर्वाधिक ५० प्लस धावा केल्या आहेत. हा पराक्रम तीन वेळा करण्याचा विक्रमही धोनीच्या नावावर आहे. इशान आणि धोनी व्यतिरिक्त पार्थिव पटेल आणि संजू सॅमसन यांनी प्रत्येकी एकदा हा पराक्रम केला आहे. सामन्याबद्दल बोलायचे तर, भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २८ षटकानंतर २ बाद १९२ धावा केल्या आहेत. शुबमन गिल ७० चेंडूत ७५ धावांवर खेळत आहे. त्याचबरोबर संजू सॅमसन २२ चेंडूत २८ धावांवर नाबाद आहे. तत्पुर्वी ऋतुराज गायकवाड ८ धावा करुन दुसऱ्या विकेट्सच्या रुपाने बाद झाला.

### इशान - गिलची 143 धावांची भागीदारी

» शुबमन गिलच्या साथीने इशान किशनने वेगाने धावा काढण्यास सुरुवात केली. इशानने ४३ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले होते. १४३ धावांच्या भागीदारीनंतर ही भागीदारी इशानच्या विकेटने तुटली. इशान ६४ चेंडूत ७७ धावा करून बाद झाला. इशानची विकेट लेगस्पिनर यानिक कारियाने घेतली. त्याचवेळी शुभमन गिलचे १५ धावांनी शतक हुकले. बमन गिल ९२ चेंडूत ८५ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत ११ चौकार मारले. गुडाकेश मोतीने त्याला करियाकरवी झेलबाद केले.

# ॲशेस ट्रॉफी ऑस्ट्रेलियाकडेच

## » वोक्स, अलीने उडवला ऑस्ट्रेलियाचा धुव्वा

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**पाचव्या कसोटी सामन्यात इंग्लंडने ऑस्ट्रेलियावर रोमहर्षक विजय मिळवला. शेवटच्या इनिंगमध्ये ३८४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ ३३४ धावांवर ऑल आऊट झाला. त्यामुळे इंग्लंडने ४९ धावांनी विजय मिळवला. पाच कसोटी सामन्यांची ॲशेश सीरिज २-२ ने बरोबरीत सुटली आहे. मात्र मागची मागची ॲशेस जिंकल्यामुळे ऑस्ट्रेलियाकडे ॲशेस कायम राहणार आहे.**



इंग्लंडने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने पाचव्या दिवसाची सुरुवात १३५/० अशी केली होती. पण शेवटच्या दिवशी इंग्लंडच्या गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यामुळे ऑस्ट्रेलियाचा संघ ऑल आऊट झाला. क्रिस वोक्सने ४, मोईन अलीने ३, स्टुअर्ट ब्रॉडने २ आणि मार्क वुडने १ विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाचा महान खेळाडू डेव्हिड वॉर्नरचीही ही शेवटची ॲशेस होती. पुढील वर्षी सिडनीत होणाऱ्या कसोटी सामन्यानंतर डेव्हिड वॉर्नर निवृत्त होणार आहे. सिडनी हे वॉर्नरचं होम ग्राऊंड आहे.

### स्टुअर्ड ब्रॉडच्या नावावर अनोखा रेकॉर्ड

शेवटची कसोटी खेळणाऱ्या स्टुअर्ट ब्रॉडने ऑस्ट्रेलियाची शेवटची विकेट घेऊन इंग्लंडला हा खास विजय मिळवून दिला. कसोटी करिअरच्या शेवटच्या चेंडूवर विकेट घेण्याचा अनोखा रेकॉर्डही यामुळे स्टुअर्ट ब्रॉडच्या नावावर कोरला गेला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ६०४ विकेट्स मिळवत ब्रॉडने निवृत्ती घेतली आहे.

पाच टेस्ट मॅचच्या या ऐतिहासिक सीरिजच्या पहिल्या दोन्ही मॅच ऑस्ट्रेलियाने जिंकल्या होत्या. यानंतर तिसऱ्या टेस्टमध्ये इंग्लंडने जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला.

मॅनचेस्टरमध्ये झालेली चौथी टेस्ट ड्रॉ झाली. या सामन्यामध्ये इंग्लंड विजयाच्या जवळ होती, पण पावसामुळे शेवटच्या दिवसाचा खेळ होऊ शकला नाही, त्यामुळे इंग्लंडच्या तोंडून विजयाचा घास हिरावला गेला.

# मी बीसीसीआयचा अध्यक्ष असतो : कपिल

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

संघाला ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये वर्ल्ड कप खेळायचा आहे. अलीकडच्या काळात टीम इंडियाची कामगिरी साधारण राहिली आहे. बहुतांश खेळाडू जखमी झाले आहेत. अशा परिस्थितीत कपिल देव यांनी बीसीसीआयबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. भारताचा माजी कर्णधार कपिल देव यांनी बीसीसीआयच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून बोर्ड आपल्या खेळाडूंची योग्य काळजी घेऊ शकत नाही, असे म्हटले आहे. भारतीय संघाच्या वेळापत्रकावरही माजी कर्णधाराने प्रतिक्रिया दिली आहे. १९८३ मध्ये भारताला विश्वचषक जिंकून देणारे कपिल देव यांनी बीसीसीआयवर संताप व्यक्त केला आहे. द वीकला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले की बोर्ड आपल्या खेळाडूंची योग्य काळजी घेत नाही. कपिल देव म्हणाले, “मला माहित नाही. पण जेव्हा तुम्ही चांगली कामगिरी करता तेव्हा ते योग्य बोर्ड असते. यात काहीही चुकीचे नाही. पण योग्य बोर्डात सुधारणा आवश्यक असते. भारतीय संघाच्या वेळापत्रकावरही माजी कर्णधार कपिल देव यांनी आपली प्रतिक्रिया दिली. कपिल देव म्हणाले, “जर मी तुम्हाला भारतीय संघाचे वेळापत्रक दाखवले, जे मी आज पाहिले आहे. हा भारत ११ सामने खेळत आहे आणि त्यांना किती प्रवास करावा लागणार आहे, असे वेळापत्रक कोणी बनवले? आता भारतात संघ खेळत असताना त्याची काळजी कशी घेतली जाईल, या गोष्टींचा विचार व्हायला हवा. माजी कर्णधार कपिल देव पुढे म्हणाले, “तुम्ही धर्मशाला, त्यानंतर बंगळुरू, कोलकाता येथे खेळत आहात. तुम्ही ९ वेगवेगळ्या ठिकाणी सामने खेळत आहात. कोणीतरी मला विचारले की तुम्ही बोर्डाचे अध्यक्ष असता तर मी काय केले असते? यावर मी उत्तर दिले, “जर मी बीसीसीआय अध्यक्ष असतो, तर मी आपल्या संघासाठी चार्टर विमानांची व्यवस्था केली असती.